## प्रेस नोट दि.१४/०३/२०१९
## येरवडा पोलीस स्टेशन
## हद्दीत मिळून आलेल्या सराईत तडीपार गुन्हेगारास अटक केली.

---

येरवडा पोलीस स्टेशनचे हद्दीतील शरिराविरूध्दचे गुन्ह्यांतील सराईत गुन्हेगार नामे- करण भारत सोनवणे, वय २० वर्षे, रा.निळा झेंडा चौक, लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे यास मा.पोलीस उप आयुक्त सो. परि-४, पुणे यांचेकडील तडीपार आदेश क्र. २४/२०१८ मुं.पो.ॲ.क. ५६(१)(ब) प्रमाणे दि.०३/१०/२०१८ रोजीपासून पुणे शहरातून दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आलेले आहे. त्याचे विरूध्द येरवडा पोलीस ठाण्याचे हद्दीत घातक शस्त्रानिशी गंभीर दुखापतीचे गुन्हे नोंद आहेत.

दिनांक ११/०३/२०१९ रोजी येरवडा पो.स्टे.अंकीत लक्ष्मीनगर चौकी बीट मार्शलचे पोलीस कर्मचारी (१) पो.शि.७४०१ नवनाथ ताम्हाणे (२) पो.शि. ७४३६ अंकुश निकम हे लक्ष्मीनगर चौकीचे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना, पहाटे ०४:०० वा.चे सुमारास त्यांना भिमज्योत मित्र मंडळाजवळ, लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे तडीपार गुन्हेगार नामे- करण भारत सोनवणे, वय २० वर्षे हा संशयास्पदरित्या मिळून आल्याने, वरील पोलीस कर्मचारी यांनी त्यास ताब्यात घेऊन त्याचेकडे तडीपार कालावधीत पुणे शहर हद्दीत येण्याचे परवानगी बाबत विचारणा केली असता त्याने अशी कोणतीही परवानगी घेतलेली नसल्याबाबत खात्री झाली. सदर आरोपीने तडीपार आदेशाचा भंग केलेला असल्याने, पो.शि. ७४३६ अंकुश सुभाष निकम, येरवडा पो.स्टे. यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर आरोपी विरूध्द येरवडा पो.स्टे.गु.र.नं. १६८/२०१९ मुं.पो.ॲ.क. १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला असून त्यामध्ये त्यास अटक करण्यात आली आहे.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडील बीट मार्शल (१) पो.शि.७४०१ नवनाथ ताम्हाणे (२) पो.शि. ७४३६ अंकुश निकम यांनी हद्दीत सतर्कतेने पेट्रोलींग करून, तडीपार आदेशाचा भंग करून विना परवानगी येरवडा पो.स्टे.चे हद्दीत मिळून आलेला तडीपार गुन्हेगार नामे- करण भारत सोनवणे यास पकडून उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे